# कापूस खरेदीत घोळ, बनावट कागदपत्रांद्वारे शासनाची फसवणूक

## टोळी सक्रिय, व्यापारी घेताहेत फायदा

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.22 )** – शेतकऱ्यांच्या हितासाठी कापसाच्या खरेदी करिता शासनाने सीसीआय मार्फत केंद्र सुरू करून शासकीय दराने कापूस खरेदीचा प्रारंभ केला. मात्र कापूस उत्पादक शेतकऱ्यां ऐवजी व्यापारीच आपले उखळ पांढरे करून घेण्यासाठी त्याचा लाभ घेत असल्याचे दिसून येत आहे. गंभीर बाब अशी की सीसीआय केंद्रावर कापसाची विक्री करण्यासाठी बनावट कागदपत्रांचा आधार घेतला जात आहे. ही कागदपत्रे तयार करून देणारी एक टोळीच सध्या सक्रिय आहे. या टोळीतील सदस्य आणि व्यापाऱ्यांसोबतच संबंधित यंत्रणेच्या संगनमतातून कापूस खरेदीतील हा घोळ सुरू असल्याचा आरोप केला जात आहे.

अंजनगाव सुरजी तालुक्यात यंदा कपाशी सोबतच तूर आणि सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात घेण्यात आले. शेतातील पिकांची नोंद शेतकऱ्यांच्या सातबारा व आठ अ कागदपत्रांवर आहे. यापूर्वी सोयाबीन आणि तुरीच्या पिकाची नाफेड मार्फत शासनाने खरेदी केली.



तेव्हाही शेतकऱ्यांकडून कमी भावात शेतमाल खरेदी केल्यानंतर व्यापाऱ्यांनी ज्यादा दराने या मालाची शासकीय केंद्रांवर विक्री केली. शासकीय केंद्रावर शेतमाल विक्री करताना कागदपत्रांची आवश्यकता लागते. व्यापारी आपले नातेवाईक, संबंधित व्यक्ती किंवा अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या कागदपत्रांवर हा शेतमाल शासनाला विकत आहेत. सोयाबीन व तूर पिकाच्या बाबतीत असाच प्रकार घडला होता. आता कपाशीचे पीक सुद्धा शेतकऱ्यांकडून कमी भावाने खरेदी करून व्यापारी चढ्या दराडे सीसीआय च्या केंद्रावर विकत आहेत. त्यासाठी बनावट कागदपत्रे ही तयार केली जात असून ही कागदपत्रे तयार करून देणारी एक टोळीच अंजनगावात सक्रिय असल्याचे समजते.

आणखी गंभीर बाब अशी की, इतर जिल्ह्यातून खरेदी केलेला निम्न दर्जाचा कापूसही अंजनगाव सुर्जीच्या सीसीआय केंद्रावर जादा दराने व्यापाऱ्यांकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे विकला जात आहे. एक प्रकारे हे एक मोठे रॅकेटच असून त्यातून शासनाची लाखो रुपयांनी फसवणूक केली जात आहे. हा गैरप्रकार घडवून आणणारे व्यापारी आणि बनावट कागदपत्र तयार करून देणाऱ्या टोळीतील भामट्यांवर आता कायदेशीर कारवाई करून हा गैरप्रकार थांबवावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

सीसीआय बोर्डाने चालू वर्षाचा असलेल्या कागदपत्रांची तपासणी केल्यास अवैधरीत्या कापूस विक्री करणारे व्यापारी व बलावट कागदपत्रे तयार करणारी टोळी सहज गजाआड होऊ शकते. मात्र त्यासाठी सीसीआय ने ही बाब गांभीर्याने घेऊन तात्काळ आवश्यक पाऊल उचलण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

# अमरावतीच्या तरुणाचा नागपुरात अपघाती मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** – स्थानिक परांजपे कॉलनी येथील शेतकरी संजय राठी यांचा मुलगा यश राठी (22) याचा मंगळवारी रात्री सावनेरहून नागपूरकडे येत असताना कमलेश्वरजवळ अपघात झाला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर अज्ञात वाहनाचा मालक पळून गेला. मृत यशची दुचाकी घटनास्थळावरून बेपत्ता असल्याचे आढळून आले. या अपघाताचा तपास कळमेश्वर पोलीस करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, यश राठी हा नागपूरच्या कॉलेजमध्ये एमबीएचे शिक्षण घेत होता. बुधवारी त्यांचा शेवटचा पेपर होता. त्यांना नागपुरात एका कंपनीत नोकरी लागली. 9 फेब्रुवारी रोजी ते या कंपनीत रुजू होणार होता. दरम्यान ते मित्राला भेटण्यासाठी सावनेरला गेला. तेथून रात्री नागपूरला परतत असताना सावनेरच्या पुढे कळमेश्वरजवळ त्याच्या वाहनाला धडक दिली. यश बराच वेळ घटनास्थळीच पडून होता. त्यानंतर या घटनेच्या माहितीवरून पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि यशला रुग्णालयात नेले. तेथे त्यांना मृत घोषित केले.



## पकड वॉरंटमधील आरोपी अटकेत

**खारतळेगाव** – न्यायालयाकडून तीन पकड वॉरंट काढूनही फरार राहणाऱ्या आरोपीला वलगाव पोलिसांनी अटक केली. सोहन सुरेश कोठारी (वय 32 वर्ष रा.वलगाव) हा आरोपी बऱ्याच दिवसापासून पोलिसांना चकमा देत होता. न्यायालयाच्या पकड वॉरंटला उत्तर देत नसल्याने पोलिसांनी त्याला आज ताब्यात घेतले. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव पानसरे यांच्या मार्गदर्शनात पोलीस नाईक शेषराव नेमाने यांनी केली.

# मोर्शी पोलीसांची जुगार अड्ड्यावर धाड

## नऊ जण पोलिसांच्या ताब्यात

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी ( दि.22 )**– पोलिसांनी 21 जानेवारी रोजी दरगाह मोहल्ला गिट्टीखदान येथील जुगार अड्ड्यावर धाड टाकून नऊ जणांना ताब्यात घेतले. रेहमत शाहा रूस्तम शाहा (52, रा. दर्गामोहल्ला, गिट्टीखदान, मोर्शी), सैयद शफिक सैर्यद रफिक (34, रा. ताजकॉलनी, मोर्शी), अविनाश महादेव जाधव (33, रा. जुनीपाण्याची टाकी जवळ मोर्शी), शेख नईम शेख हमीद (47, रा. जुनीपाण्याची टाकीजवळ, मोर्शी), वसिम अथहर अब्दुल अजिज (37, रा. फरिद कॉलनी, मोर्शी), शेख शाहरूख शेख सलिम (30, रा. आठवडीबाजार, मोर्शी), शेख ईकबाल शेख कुल्लु (32, रा. गिट्टीखदान, मोर्शी), संदीप रामदास भोयर (40, रा. गिट्टीखदान, मोर्शी) व नरेंद्र भिमराव जाधव (36, रा. जुनीपाण्याचीटाकी, मोर्शी) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातुन 10 हजार 50 रुपयांची रोख, पत्ते, व पाच मोबाईल तसेच चारचाकी वाहन असा एकुण 4 लाख 41 हजार 800 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



# धिंड प्रकरणातील त्या वृध्देची प्रकृती बिघडली

## अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात केले दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर/ चुरणी, ( दि.22 )** – चिखलदरा तालुक्यातील रेट्याखेडा येथे जादुटोणा करित असल्याच्या संशयातून एका वृध्देवर अनन्वीत अत्याचार करुन तिची गावातून धिंड काढण्यात आली होती. या घटनेतील त्या वृध्देची प्रकृती बिघडली असून तिच्यावर अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



30 डिसेंबर रोजी रेट्याखेडा येथे जादूटोण्याच्या संशयावरून 77 वर्षीय वृध्देची धिंड काढून अघोरी छळ करण्यात आला होता. या काही गावकऱ्यांनी या जखमी वृध्देला गावाबाहेर 6 किलोमीटर जंगलात नेवून सोडण्यात आले होते. त्या वृध्देची आता अचानक प्रकृती बिघडली असून तिला जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तुर्तास या वृध्देवर उपचार सुरु असून शरिरात साखरेचे प्रमाण वाढल्याने या वृध्देची प्रकृती बिघडल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे.

### आरोपींची कोठडी वाढली, महिलेचा एमसीआर

यात्रकरणी अटक बाबू झापू जमुनकर (वय 45), सायबु भुऱ्या चतुर (वय 32), रामजी भूऱ्या चतुर (वय 42), कविता सायबु चतुर (वय 35), साबुलाल तुंबा चतुर (वय 32, रेट्याखेडा) आरोपींची पोलीस कोठडी संपल्याने त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने यातील महिला आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनाविण्यात आली, तर पुरुष आरोपींना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनाविण्यात आली.

# येवदा ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रतिभा माकोडे अपात्र

## विभागीय आयुक्तांचा निर्णय






**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.22 )** – पदाचा दुरुपयोग व कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत येवदा ग्रामपंचायत च्या सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांना विभागीय आयुक्तांनी सरपंच व ग्रा.प. सदस्य पदावरुन अपात्र केले.

याप्रकरणी प्रदीप वडतकर यांनी विभागीय आयुक्तांना तक्रार केली होती. तक्रारमध्ये सांगितले की, येवदा येथील गावठाण हद्दीतील 1 लाख 50 हजार चौरस फुटाची खुली जागा आहे. सदरची जागा शासनाची परवानगी घेतल्याशिवाय कोणालाही हस्तांतरीत करता येत नाही. परंतु येवदा येथील ही स्थावर मालमत्ता हस्तांतरण करण्याबाबत कोणतेही आदेश नसताना ग्रामपंचायतीने या मालमत्तेची नियमबाह्य पध्दतीने फेरफार घेऊन खाजगी संस्थेला बेकायदेशिर पध्दतीने जागेचा नमुना 8-अ तयार करुन दिला आणि त्या जागेची नोंद करुन ताबा देखील दिला आहे. सदर स्थावर मालमत्तेची नोंद करुन ताबा देण्याबाबत मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबतचे सर्व पुरावे तक्रारकर्ते प्रदीप वडतकर व सुयोग टोबरे यांनी आयुक्त कार्यालयाकडे सादर केले होते. या कागपत्रांची पडताळणी करित सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग तथा कर्तव्यात कसुर करुन वरिष्ठ कार्यालय व शासन निर्णयाचा अवमान केल्याचे दिसून आले. त्यामूळे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, 1959 चे कलम 39 (1) मधील तरतुदीनुसार त्यांना सरपंच तथा सदस्य पदाकरिता अपात्र घोषीत करण्यात आले.

या निर्णयामुळे दर्यापुर तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अर्जदार यांच्या बाजुने अ‍ॅड.अरविंद गुडधे यांनी सक्षम बाजु मांडली. सदर प्रकरणात जमीनीच्या हस्तांतरण केल्याने संबधित सरपंच यांच्या विरोधात फौजदारी कारवाई करण्यात यावी अशी मागणी प्रदीप वडतकर व सुयोग टोबरे यांनी विभागीय आयुक्तांकडे केली आहे.

# तूर काढणीचे काम करताना यंत्रात पडून युवकाचा मृत्यू

## आडगाव खाडे शेत शिवारातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.22 )**– शेतात तूर काढणी करत असताना काढणी यंत्रात पडून मजुर युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना अंजनगाव सुर्जी तालुक्यातील आडगाव खाडे गावाच्या शेत शिवारात (दि.22) घडली आहे. मशीनमध्ये अडकल्याने मजुराच्या पायाचे तुकडे झाले आहेत. अंकुश रंगराव सरदार (वय 32) असे मृत झालेल्या मजुराचे नाव आहे. तूर काढणीच्या कामासाठी हेडंबा मळणी यंत्र या कटर मशीनद्वारे तूर काढणी सुरु होती. यासाठी अडगाव नबापूर शेत शिवारात अंकुश रंगराव सरदार (32) हा युवक उमेश हेंड यांच्या शेतात तुर काढणीच्या कामासाठी गेला होता. अंकुश सरदार मळणी यंत्रावर तूर काढण्यासाठी तुरीच्या झाडाच्या काड्या यंत्रात टाकण्यासाठी मशीन वर चढलेला असतांना त्यांचा तोल जाऊन तो मळणी यंत्राच्या कटरमध्ये पडला. यात क्षणार्धात अंकुश मशीनच्या आतमध्ये ओढला गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान तूर काढणीच्या हेडंबा मळणी यंत्राच्या कट्टरमध्ये अंकुश पडल्याने आतमध्ये ओढले जाऊन त्यांचा पाय व कमरेचे तुकडे वेगळे झाले व त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतातील अन्य मजूर व शेतमालक प्रचंड घाबरले होते. अचानक घडलेल्या घटनेमुळे खळबळ उडाली असून घटनेबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली. यानंतर घटनास्थळी अंजनगाव सूर्जी येथील पोलीस दाखल झाले होते. त्यांनी नागरिकांच्या मदतीने अंकुशला यंत्राच्या बाहेर काढले. पोलिसांनी पंचनामा करून पुढील प्रक्रिया सुरु केली होती आहे. मृतक अंकुशच्या घरची परिस्थिती हलाखीची असून त्यांला दोन लहान मुले आहेत. दरम्यान या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.



# रामापूरमध्ये कालवडीची शिकार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.22 )**– पथ्रोटपासून काही अंतरावर असलेल्या रामापूर गावानजीकच्या शेतशिवारात सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास वन्यप्राण्याने कालवडचा फडशा पाडला. मंगळवारी (दि.22) ही घटना उघडकीस आली. मौजा पथ्रोट भाग-1 मधील रामापूर गावानजीक कुलदीप उर्फ विक्की अशोकराव पटोकार यांचे शेत आहे. त्यांच्या शेतातच जनावरे बांधलेली असतात. सोमवारी मध्यरात्री वन्यप्राण्याने एका कालवडवर हल्ला करून तिची शिकार केली. कालवडची अवस्था बघून तिच्यावर बिबट्यासारख्या वन्यप्राण्याने हल्ला केल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

# दत्तापुर येथे घरफोडी करणारे अट्टल चोरटे जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** – दत्तापूरात घरफोडी करणार्या दोन अट्टल चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 22 जानेवारी रोजी जेरबंद केले. आकाश राजु वाढवे (21, रा. शांतीनगर, वडगाव, अवधुतवाडी, जि. यवतमाळ) व रोहित उर्फ लकी अनिल अवरासे (21, रा. गिट्टी फैल, सावंगी मेघे, जि. वर्धा) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून 2 हजार 800 रुपयांची रोख व एक लोखंडी रॉड असा एकुण 2 हजार 900 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला पुढील कारवाई करीता दत्तापुर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पुढील तपास दत्तापुर पोलिस करीत आहे.

18 जानेवारी रोजी फिर्यादी अविनाश विठ्ठलराव दाते (रा. दत्तापुर) यांनी दत्तापुर येथे तक्रार दिली की, 17 जानेवारी रोजी सायंकाळी ते कुटूंबासह लग्न कार्यप्रसंगी वर्धा येथे गेले होते. रात्रीदरम्यान परतल्यावर त्यांना घराच्या दाराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरातील साहित्यांची पाहणी केली असता, घरातून 3 हजार 400 रुपये व व बेन्टेक्सचे दागिने असा एकुण 3 हजार 500 रुपयांचा ल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेल्याचे दिसुन आले. या तक्रारीवरुन दत्तापुर आरोपीविरुध्द गुन्हा नोंद केला. सदर गुन्ह्याच्या समांतर तपासात स्थानिक गुन्हे शाखेच्या रेकॉर्डवरील आरोपीचा शोध घेतला. दरम्यान चांदुर रेल्वे उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना पोलिसांना गोपनिय माहिती मिळाली की, 17 जानेवारी रोजी दत्तापुर हद्दीतील न्यु राठी नगरात घरफोडी ही यवतमाळ येथे राहणारा आकाश वाढवे याने त्याच्या साथीदारासह केली. सध्या तो त्याचे साथीदारासह देवगाव चौकात उभा आहे. अशा माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक देवगाव चौकात पोहोचले. पोलिसांनी आकाश राजु वाढवे व रोहित उर्फ लकी अनिल अवरासेला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली.

# टुरिंग टॉकीजचा व्यवसाय इतिहासजमा होण्याच्या मार्गावर

## बहिरम यात्रेत यंदा एकही पडदा लागला नाही

## प्रेक्षकांची अनास्था आणि सरकारची उदासीनता

**मारोती पाटणकर**
**चुरणी,( दि.22 )**– ग्रामीण भागात भरणाऱ्या यात्रा महोत्सवांमध्ये टुरिंग टॉकीज हे मनोरंजनाचे खास साधन मानले जायचे. तंबूत पडद्यावर दाखवले जाणारे चित्रपट बघण्यासाठी रसिकांची झुंबड उडायची. पण आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात बदलत्या परिस्थितीमुळे एकेकाळी समृद्ध असलेला हा टुरिंग टॉकीजचा व्यवसाय आज इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहे. सध्या बहिरम मध्ये सुरू असलेल्या यात्रेतून याची प्रचिती मिळते. बहिरम यात्रेत दरवर्षी अनेक टुरिंग टॉकीज लागायच्या यंदा मात्र एकही टॉकीज यात्रेत दिसून येत नाही. प्रेक्षकांची अनास्था आणि शासनाची उदासीनता ही टुरिंग टॉकीजचा व्यवसाय डबघायीस येण्यासाठी कारणीभूत ठरली आहे.



पूर्वीपासून शहरी व ग्रामीण भागात लोकांना हिंदी चित्रपटांचे वेड राहिले आहे. ग्रामीण भागात चित्रपटगृहांची व्यवस्था नव्हती आणि नेहमी शहरात येऊन चित्रपट पाहणे ग्रामीण भागातील रसिकांना शक्य होत नव्हते. चित्रपट बघण्याची त्यांची हौस खेडोपाडी भरणाऱ्या जत्रांमधील टुरिंग टॉकीज चे तंबू भागवायचे. एकेका यात्रेत डझनावरी टुरिंग टॉकीज लागायच्या. अमरावती जिल्ह्यातील बहिरम ची यात्रा तर टुरिंग टॉकीज साठी अक्षरश: प्रसिद्ध होती. अनेक लोक तर टुरिंग टॉकीज मध्ये चित्रपट बघण्यासाठीच बहिरमच्या यात्रेत यायचे. सर्व तंबूंमध्ये प्रत्येक खेळाला चित्रपट शौकिनांची झुंबड असायची. टुरिंग टॉकीज चे तंबू हे ग्रामीण भागातील जत्रांची शान मानली जायची.

> ग्रामीण भागातील कष्टकरी जनता या फिरत्या चित्रपटगृहांचे हक्काची प्रेक्षक होते. गोल तंबूत जमिनीवर बैठक मारून चित्रपटाचा आनंद लुटणारे प्रेक्षक यात्रांमधून दिसायचे. कौटुंबिक मराठी चित्रपट आणि दाक्षिणात्य सिनेमांना विशेष मागणी होती. टुरिंग टॉकीज ही यात्रा जत्रांची शान मानली जात असे. आज मात्र बहिरम यात्रेत एकही टुरिंग टॉकीज दाखल झाली नाही. सिनेमा रसिकांचा त्यामुळे भ्रमनिरास झाला आहे.
> **नरेश तायवाडे, प्रेक्षक**

आज मात्र बदलत्या परिस्थितीत अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे मनोरंजनाची विविध साधने अगदी ग्रामीण भागातही मुबलक प्रमाणात उपलब्ध झाली आहे. नव्याने प्रदर्शित होणारे चित्रपट घरी बसून बघता येण्याची सोय आहे. त्यामुळेच यात्रेमध्ये लागणाऱ्या टुरिंग टॉकीज कडे अलीकडच्या काही वर्षात प्रेक्षकांनी पाठ फिरवल्याचे चित्र निर्माण झाले होते. महिना महिनाभर तंबू उभारून प्रेक्षकच येत नसल्याने टुरिंग टॉकीज व्यवसायिकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत होते. त्यामुळे अनेकांचे टुरिंग टॉकीज व्यवसाय बंद पडलेत. बहिरम सारख्या मोठ्या यात्रेतही यंदा टुरिंग टॉकीज व्यावसायिकांनी आपला तंबू उभारण्याचे टाळले आहे.

महाराष्ट्रात 1956 मध्ये टुरिंग टॉकीज व्यवसायाला सुरुवात झाली होती असे सांगितले जाते. राज्यभरात सुमारे दोन हजारावर टुरिंग टॉकीज होत्या, हे व्यवसायिक प्रामुख्याने गावोगावी भरणाऱ्या जत्रा, यात्रांमध्ये तंबू उभारून चित्रपट दाखविण्याचा व्यवसाय करायचे. आज मात्र बदलत्या काळात एकेकाळी ऐश्वर्य संपन्न असलेला हा व्यवसाय अखेरच्या घटका मोजत असल्याचे चित्र आहे.

# आपदा मित्रांनी नदीतून बाहेर काढला मुकुंदाचा मृतदेह

## मंगळवारी घडली होती घटना



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी( दि.22 )**– मोर्शी-वरुड मार्गावर नदीपात्रात मुकुंदा पंजाबराव माथनकर नामक 55 वर्षीय व्यक्ती बुडाल्याची घटना घडली होती. आपत्ती व्यवस्थापन पथकातील आपदा मित्रांनी मुकुंदा माथनकर यांचा मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढण्यात यश मिळविले.

मंगळवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास मुकुंदा माथनकर हे नदीपात्रात बुडाल्याची घटना घडली होती. याबाबत अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना माहिती मिळताच त्यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांना तत्काळ घटनास्थळी रवाना केले होते. रामेकर यांनी घटनास्थळी पोहोचून मोर्शीच्या आपदा मित्रांना तेथे पाचारण केले व नदीपात्रात मुकुंदा माथनकर यांचा शोध सुरू केला होता. आपदा मित्रांनी लाईफ बॉय जॅकेट, रोप व बांबू रस्सी पासून बनवलेल्या स्ट्रेचरच्या साह्याने मुकुल चा मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढला.

मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. या रेस्क्यू टीम मध्ये आपदा मित्र प्रियांशु तायवाडे, सागर तायडे, तसेच जीवनसेतू जलमित्र सुरेश दुर्वे, अनिमेय तायवाडे, हर्षल गलफट यांचा समावेश होता. यावेळी घटनास्थळी लोकांनी मोठी गर्दी केली होती.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# 1 हजार 322 शेतकरी नोंदणीपासून वंचित

## ■ नाफेड सोयाबिन खरेदीची मुदत संपली
## ■ ऑनलाईन पोर्टल सुरू करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.22 )**– नाफेड सोयाबिन खरेदीची मुदत संपली असुन 1 हजार 322 शेतकरी ऑनलाईन नोंदणीपासून वंचित राहिले आहे. त्यामुळे ऑनलाईन पोर्टल सुरू करून सोयाबिन खरेदी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

नाफेड कडून सन 2024 मध्ये खरेदी करण्यात येत असलेल्या सोयाबिन खरेदीची मुदत 12 जानेवारीला संपली. त्यापूर्वी 6 जानेवारी रोजी रात्री 12 वाजता ऑनलाईन सोयाबिन नोंदणीचे पोर्टल बंद झाल्याने चांदूर रेल्वे तालुक्यातील 1 हजार 322 शेतकऱ्यांचे ऑनलाईन नोंदणीपासुन वंचित राहिले आहे. नाफेडतर्फे 6 जानेवारी पर्यंत सोयाबिन नोंदणी करण्याकरीता मुदतवाढ दिली होती. त्या अनुषंगाने चांदूर रेल्वे खरेदी–



विक्री समितीकडे 3 हजार 81 अर्ज प्राप्त झाले. पोर्टलच्या ओटीपी सारख्या जाचक अटीमुळे आणि पोर्टल सतत बंद असल्यामुळे 7 जानेवारी पर्यंत केवळ 1 हजार 760 शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी झाली. ऑनलाईन पोर्टल 6 जानेवारीच्या रात्री 12 वाजता बंद झाल्याने अर्वरीत 1 हजार 322 शेतकऱ्यांचे ऑन लाईन नोंदणी होणे बाकी आहे. त्यामुळे सोयाबिन नोंदणीचे पोर्टल पुन्हा एक महिण्याकरीता सुरू करण्यात यावे आणि त्यानुसार सोयाबिन खरेदीला मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी चांदूर रेल्वे तालुक्यातील शेतकरी बांधवांची आहे.

> शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले सोयाबिन ऑनलाईन नोंदणी करतांना अनेक अडचणी आल्या. त्या अडचनी वरीष्ठ कार्यालयाला कळविण्यात आल्या. त्याप्रमाणे आमदार प्रताप अडसड यांसह माजी आ. वीरेंद्र जगताप, चांदूर रेल्वे तहसिलदार व सहाय्यक निबंधक,चांदूर रेल्वे यांना लेखी पत्र देवुन सोयाबिन नोंदणीकरीता प्राप्त अर्जांची ऑनलाईन नोंदणीला मुदतवाढ देण्यात यावे अशी विनंती करण्यात आली आहे.
>
> **गोविंदराव देशमुख**
> **अध्यक्ष, खरेदी–विक्री समिती,चांदूर रेल्वे**

# रेशन दुकाना संदर्भातील दक्षता समित्या ठरत आहे निरुपयोगी

## कुठे समित्यांचे गठनच नाही | काही ठिकाणी केवळ नामधारी समित्या | गैरप्रकारांना आळा घालणार कोण ?

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.22 )** – सरकारी रेशन दुकानातील वितरण व्यवस्थेसोबतच अन्य महत्त्वपूर्ण बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रामपातळीवर तयार करण्यात आलेल्या दक्षता समित्या पूर्णत: निरुपयोगी ठरत आहे. काही ठिकाणी नव्याने या समित्यांचे गठनच करण्यात आलेले नाही. तर काही ठिकाणी जिथे या समित्या अस्तित्वात आहेत, त्य पदाधिकारी व सदस्यांच्या उदासीनतेमुळे केवळ नामधारी ठरत आहे.

दर महिन्याला समितीने बैठक होणे अपेक्षित असताना अनेक महिन्यांपासून या बैठकीही झाल्या नाहीत आणि समिती सदस्यांनी रेशन दुकानांना भेटी देऊन पाहणी केली नाही. परिणामी कुठलीही तक्रार असल्यास सर्वसामान्य ग्राहकांना थेट पुरवठा विभागाकडेच दाद मागावी लागत आहे. दक्षता विभागाच्या दुर्लक्षामुळे गैरप्रकार वाढण्याची शक्यता असून त्यावर लक्ष ठेवणार कोण असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तर तीन वर्षांनी रेशन दुकाना संदर्भातील दक्षता समितीचे नव्याने गठन केले जाते. ग्राम पातळीवर अध्यक्ष, सचिव, सदस्य निवडले जातात. मात्र अनेक समित्यांचा तीन वर्षांचा कालावधी संपलेला असतानाही तेथे अद्याप नव्याने समित्या गठन करण्यात आलेल्या नाही. या अशासकीय समितीमध्ये अध्यक्ष म्हणून सरपंच किंवा तलाठी तर सचिव, सदस्यांमध्ये विविध कार्यकारी अधिकारी, सोसायट्यांचे सदस्य, गावातील प्रतिष्ठित तीन महिला, विरोधी पक्षाची दोन सदस्य, अनुसूचित जाती–जमातीचे प्रतिनिधी व एक सामाजिक कार्यकर्ता यांचा समावेश करण्याचे प्रावधान आहे.

समितीचा तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेद्वारे नव्याने पदाधिकाऱ्यांची निवड करून ही अशासकीय समिती गठीत केली जाते. परंतु अनेक ठिकाणी अद्यापही समितीच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आलेली नाही. दर महिन्याला नियमित बैठका घेऊन समिती रेशन दुकाना संदर्भातील अहवाल तहसीलदारांना पाठवत असते पण समितीच अस्तित्वात नसल्याने बैठकाच झालेल्या नाही. दुकानदारासंबंधी काही तक्रारी असल्यास ग्राहकांना आता थेट पुरवठा विभागाकडेच धाव घ्यावी लागत आहे. रेशन दुकानदारांवर कुठलेच नियंत्रण नसल्याने बनावट शिधापत्रिकेसोबतच अन्य अनेक गैरप्रकार वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून या समित्यांचे गठन करण्यासाठी पुढाकार घ्यावा तसेच अस्तित्वात असलेल्या पण कामाच्या बाबतीत उदासीन असलेल्या समित्यांना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत अशी अपेक्षा सर्वसामान्य रेशन ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे.



### दक्षता समितीची कामे

शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा रेशन दुकानातून केला जातो की नाही हे तपासण्याची जबाबदारी दक्षता समितीची आहे. त्यासोबतच शिधापत्रिका तपासणे, बनावट शिधापत्रिका व गरजू रहिवाशांना मिळालेल्या शिधापत्रिकांचा आढावा घेणे, स्वस्त धान्य दुकानात होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करणे, तक्रार नोंदवाही तपासून त्यांची निवारण करण्यासाठी आवश्यक पावली उचलणे, आधी आधी कामे दक्षता समितीला करावी लागतात.

# गिरीश चौधरी यांचा 30 पासून अन्नत्याग

## विविध मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.22 )**– अंजनगाव बारी सर्कल मधील म्हसवडच्या जाणता युवा संघटनेचे संस्थापक व सामाजिक कार्यकर्ते गिरीश चौधरी यांनी विविध मागण्यांसाठी 30 जानेवारी हुतात्मा दिनापासून अन्नत्यात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या संदर्भात त्यांनी पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदार यांच्यासह जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्तांना निवेदन पाठविले आहे.

या निवेदनातून गिरीश चौधरी यांनी विविध मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक गावात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा



उभारण्यात यावा.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल चुकीचे वक्तव्य करणाऱ्या गृहमंत्री अमित शहा यांनी तत्काळ संसदेत माफी मागावी व गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी तसेच नियमित कर्ज अदा करणाऱ्यांना एक लाख रुपये अनुदान द्यावे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संत गाडगे महाराज आणि शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न देण्यात यावा, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षण लागू करून घेण्यात याव्या, लाडक्या बहीण योजनेत लाभार्थी महिलांना दरमहा 3100 रुपये देण्यात यावे, संजय गांधी, श्रावण बाळ निराधार योजनेचे मानधन वाढविण्यात यावे, मासोद परिसरातील दुर्दशाग्रस्त रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी, मासोद येथील सर्व अतिक्रमणे नियमाकुल करून त्यांना आठ अ देण्यात यावा आदी मागण्या या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

## प्रदीप गडेकर यांचे निधन

**हिवरखेड** – येथील प्रतिष्ठित नागरिक तसेच किराणा व कापड व्यावसायिक प्रदीप बाबारावजी गडेकर यांचे 12 जानेवारी रोजी रात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर गावातील निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदीप गडेकर यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून, जावई, नातवंड व आप्तपरिवार आहे.



# श्री संत साईबाबा सार्वजनिक वाचनालयात वाचन संकल्प कार्यक्रम

## विद्यार्थ्यांनी केले सामूहिक वाचन
## मालखेड रेल्वे येथे आयोजन


**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,( दि.22 )**– तालुक्यातील मालखेड येथे श्री संत साईबाबा सार्वजनिक वाचनालयात वाचन संकल्प कार्यक्रम पार पडला, विद्यार्थ्यांसोबतच गावातील प्रौढ नागरिकांनी देखील यात सहभाग घेतला होता.

वाचनाचे ज्ञानार्जनात अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता महाराष्ट्र शासनाचा वाचन संकल्प या उपक्रमाअंतर्गत सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विद्यार्थ्यांचा सामूहिक वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष शुभांगिनी रवींद्र वंजारी,माजी सरपंच कल्पना निचत, ग्रामपंचायत सदस्य प्रणिता डकरे, मृणालिनी देशमुख तसेच ग्रंथालयीन कर्मचारी देखील उपस्थित होते.

# घरकुलात घोळ, सरपंच, सचिवावर गुन्हे दाखल करा!

## शिरजगाव बंड ग्रामपंचायत सदस्यांची मागणी | वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली लेखी तक्रार




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.22 )**– तालुक्यातील शिरसगाव बंड ग्रामपंचायत च्या हद्दीत आठ नसलेल्या व्यक्तींना घरकुलाचा बेकायदेशीररित्या लाभ मिळवून दिल्याचा आरोप करीत, या प्रकरणात ग्रामपंचायतीच्या सरपंचा व सचिवा विरोधात फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य पायल गजानन रावले यांनी केली आहे. यासंदर्भात विभागीय आयुक्त, जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्यासह पंचायत समितीकडे रावले यांनी लेखी तक्रार केली आहे. शिरसगाव वन ग्रामपंचायत मध्ये इतरही अनेक बाबतीत मोठा गैरप्रकार झाला असून त्याचीही चौकशी करण्यात यावी अशी मागणी रावले यांनी केली आहे.

शिरजगाव बंड ग्रामपंचायत हद्दीतील वार्ड क्रमांक एक मध्ये रमाई घरकुल योजनेअंतर्गत 2023 ते 2024 या कालावधीत नमुना आठ नसलेल्या लाभार्थ्यांना बेकायदेशीररित्या घरकुल उपलब्ध करून देण्यात आल्याचे रावले यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. सरपंच नंदा प्रमोद वाकोडे आणि सचिव पुरुषोत्तम पंढरीनाथ येवले यांनी हा गैरप्रकार घडवून आणण्याचा आरोप पायल रावले यांनी केला आहे. याबाबत चांदूरबाजारच्या गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली होती पण त्यांनी थातूरमातूर कारवाई करून सचिव व सरपंचांना वाचवण्याचा प्रयत्न केला, असे पायल रावले यांचे म्हणणे आहे.

बेकायदेशीर घरकुल दिल्याबद्दल ग्रामसेवक येवले यांना पंचायत समितीने चौकशी करून दोषी ठरविले आहे. तसा अहवाल वरिष्ठांना सादर करून येवले यांना दीड लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. मात्र अद्याप ही रक्कम येवले यांच्याकडून वसूल करण्यात आलेली नाही. या प्रकरणात इवले यांच्यासोबतच सरपंचा सुद्धा तेवढ्याच दोषी असल्याने त्यांच्यावरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे असे पायल रावले यांनी, आपल्या तक्रारीत नमूद केले आहे.

> तक्रारदारांच्या 18 सप्टेंबर 2024 च्या अर्जानुसार आपण सदर प्रकरणाची संपूर्ण चौकशी केली असून त्याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविला आहे. त्यांच्या निर्देशानुसार पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> **निखिल नागे,**
> **विस्तार अधिकारी,**
> **चांदूर बाजार**

> बेकायदेशीरित्या घरकुल उपलब्ध करून देणे आणि कचरा गाडी अपघात प्रकरणात सचिवा एवढ्याच सरपंच सुद्धा दोषी आहेत. पंचायत समिती प्रशासनाने सचिवांना दंड ठोठावला मात्र सरपंचांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे. पंचायत समिती अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद आहे.
>
> **पायल गजानन रावले**
> **तक्रारदार व सदस्य**

> सदर तक्रारी बाबत मी माझे भयान नोंदविले आहे. संबंधित घरकुलाबाबत चा आठ अ माझ्या कार्यकाळातील नाही. तसेच आठ किंवा अन्य कागदपत्र तयार करण्याचे काम सरपंचाचे नसून ही जबाबदारी सचिव आणि कर्मचाऱ्यांची असते. चौकशी अहवालात मी दोषी आढळल्यास कारवाई होईल.
>
> **नंदा प्रमोद वाकोडे,**
> **सरपंच**



# पांढरघाटीच्या जिल्हा परिषद शाळेला संगणक संच भेट

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.22 )** – तालुक्यातील खडका जामगाव येथील सॉफ्टवेअर इंजिनियर रितेश कुबडे व भाग्यश्री कुबडे या दाम्पत्याने पांढरघाटी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला संगणक भेट देऊन आपल्या सामाजिक बांधिलकीचा परिचय दिला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेतलेले रितेश कुबडे सध्या सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करीत असून सुद्धा त्यांना आजही जिल्हा परिषद शाळेविषयी तेवढीच आपुलकी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी हा या डिजिटल युगात टिकला पाहिजे किंबहुना शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी झाला पाहिजे हा उद्देश ठेवून त्यांनी शाळेला संगणकाचा एक संच भेट दिला. समाजामध्ये देणगी देणाऱ्यांची कमी नाही परंतु त्या देणगीतून समाजाचं हित कसं साध्य करता येईल ही भावना असायला हवी. जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठीच मी पांढरघाटीच्या शाळेला संगणक भेट दिला असे सत्काराप्रसंगी रितेश कुबडे म्हणाले. याप्रसंगी नागपूरचे आर्किटेक माधवराव देशपांडे, खडक्याचे सरपंच राहुल फुले, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे, पत्रकार विलास पाटील उपस्थित होते, याप्रसंगी दानशूर रितेश कुबडे व भाग्यश्री कुबडे यांचा शाल व श्रीफळ देऊन मान्यवरांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक शिक्षक विजय घोरपडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक सुधीर कांबळे यांनी मानले. यावेळी सुधाकरराव कुबडे, नामदेव सानप, सुखदेवराव कोडापे, विजय इडपाची, जगदीश परतेती, उषा धुर्वे, माला आहाके, बेबी बंगाले व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उघड्यावर शौचास जाणाऱ्या 117 जणांना पथकाचे ‘गुड मॉर्निंग’

## पुष्पगुच्छ देवून गांधीगिरी | फेब्रुवारी महिन्यापासून गुन्हे दाखल करणार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.22 )** – उघड्यावर शौचास जाणाऱ्या 117 जणांना पंचायत समितीच्या पथकाने गुड मॉर्निंग करत त्यांना पुष्पगुच्छ देवून उघड्यावर शौचास बसण्याचे नुकसान समजावून सांगितले. 6 तालुक्यांमध्ये असे पथक सक्रीय झाले आहेत. जनजागृती केल्यावरही जे लोक ऐकण्याच्या मानसिकतेत नाही, अश्या लोकांवर फेब्रुवारी 2025 महिन्यापासून गुन्हे दाखल केले जाणार आहे.

जिल्हयातील काही गावांमध्ये अद्यापही काही ग्रामस्थ उघडयावर शौचास बसून गावाच्या सार्वजनिक आरोग्यास



धोका निर्माण करित आहे. त्यामूळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, संजिता महोपात्रा यांनी विविध पंचायत समितींच्या गट विकास अधिकाऱ्यांना पत्राव्दारे जिल्हयातील गावांमध्ये उघडयावर शौचास जात असलेल्या ग्रामस्थांवर स्थानिक ‘दक्षता समिती’ मार्फत दि. 7 जानेवारी 2025 पासून कारवाई करण्याचे सक्त निर्देश दिले. त्यानुसार उघड्यावर शौचास बसणाऱ्या ग्रामस्थांवर गांधीगिरी चे माध्यमातून कारवाई होत असून पहिल्या टप्प्यात पुष्प देण्यात येत असून, जिल्ह्यातील चांदूर रे, मोर्शी, चांदूर बाजार, तिवसा, भातुकली, नांदगाव खंडेश्वर या 6 तालुक्यातील 36 गावात गुडमॉर्निंग पथकाने 117 ग्रामस्थांना उघड्यावर शौच करताना पकडले असून, त्यांना समज देत पुष्प देऊन सोडण्यात आले आहे. फेब्रुवारी व मार्च 2025 मध्ये मात्र जे ग्रामस्थ उघड्यावर शौचास जातील त्यांचे वर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1959 मधिल तरतुदी तसेच मुंबई पोलीस अधिनियम 1951 चे कलम 115 ते 117 अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद अमरावती प्रशासनाने ठरविले आहे. ग्रामस्तरावर ‘हगणदारीमुक्त गाव निगराणी समिती तथा दक्षता समिती’ स्थापन करण्यात आली असून, सदर समिती मार्फत गुडमॉर्निंग उपक्रम राबविण्यात येत आहे.

# प्रहारच्या जंगी शंकरपटाचा थाटात झाला शुभारंभ

## प्रेक्षकांची एकच गर्दी, तीन दिवस रंगणार जुगलबंदी

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार ( दि.22 )**– बहिरम बाबा यात्रा महोत्सवात प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आयोजित जंगी शंकरपटाचा मंगळवारी(दि.21) थाटात शुभारंभ झाला. मान्यवरांच्या उपस्थितीत या सोहळ्याचे उदघाटन पार पडले.

बैलजोडी मालक भैय्यासाहेब ठाकरे यांच्या शिवा, गोविंदा जोडीने या शंकरपटाचा शुभारंभ झाला. 21 ते 23 जानेवारी दरम्यान हा शंकरपट असणार आहे. दुचाकीसह लाखो रुपयांचे बक्षिस विजेत्या स्पर्धकांना देण्यात येणार आहे.

शंकरपटाच्या व्यासपीठावर सभापती सतीश मोहोड, उपसभापती विनोद राऊत, बल्लू जवंजाळ, प्रवीण पाटील, नंदू निचळे, घनश्याम पेठे, दीपक



बाहे, सतीश शेळके, अविनाश सुरजे,मोहन वानखडे, विलास बुरघाटे, गजेंद्र गायकी, राजेश सोलव, मंगेश देशमुख, संतोष काळबांडे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.मान्यवरांच्या उपस्थितीत या शंकरपटाचे उदघाटन पार पडले. वीस वर्षांपासून निरंतर बच्चू कडू या यशस्वी शंकरपटाचे आयोजन करत असून विदर्भात या शंकरपटाचा नावलौकिक आहे. महाराष्ट्र सह मध्य प्रदेशातील बैलजोड्या या शंकरपटात स्पर्धक म्हणून सहभागी झाले आहेत. दोन गटात होणाऱ्या या शंकरपटाच्या स्पर्धकांना तीन दुचाकी वाहने व लाखोंची बक्षिसे देण्यात येणार आहेत. 23 जानेवारी रोजी अमरावती मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे,संचालक नरेशचंद्र ठाकरे, जयप्रकाश पटेल,सुनिलभाऊ वऱ्हाडे, अजय मेहकरे, आनंदभाऊ काळे, चित्रा प्रशांत डाहाणे, यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे.